ISBN 978-93-82504-77-1

Book chapter

# १९९० नंतरचे
# मराठी वाङ्मयातील विविध प्रवाह

**संपादक**

डॉ.युवराज धबडगे

**सह संपादक**

प्रा. बोंतेवाड नागेश रामलू

# १९९० नंतरचे
# मराठी वाङ्‌मयातील विविध प्रवाह


• संपादक •

**डॉ.युवराज धबडगे**

मराठी विभागप्रमुख, दगडोजीराव देशमुख कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,बजाजनगर(वाळूज),
ता.गंगापूर,जि.औरंगाबाद.(महाराष्ट्र)

• सह संपादक •

**स.प्रा. बोतेवाड नागेश रामलू**

मराठी विभाग, दगडोजीराव देशमुख कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाळूज.
ता. गंगापूर जि. औरंगाबाद. (महाराष्ट्र)



**New Voices Publication, Aurangabad.**

**ISBN 978-93-82504-77-1**

१९९० नंतरचे ग्रामीण कादंबरीतील राजकीय जीवन जाणिवा
प्रा.एन.एम.करडे १४२

१९९० नंतरचे कादंबरी लेखन
**स.प्रा. गायकवाड एस.एस.** १४८

दलित शाहिर आणि चळवळ
**प्रा.डॉ.भास्कर मुरलीधर अहिरे** १५२

१९९० नंतरचे कोत्तापल्ले यांचे कथालेखन
**प्रा. डॉ.अनिता प.खंडागळे** १५८

१९९० नंतरची मराठी कादंबरी (विशेष संदर्भ : धम्म सांगती बाबा)
**प्रा.डॉ. मिलिंद माणिकराव वाव्हळे** १६१

उर्मिला पवार यांचे कथालेखन
**प्रा.अर्चना सोनवणे (काटकर)** १६५

संघर्षसिध्द झालेल्या समाजाचा उद्‌गार म्हणजे दलित साहित्य
**प्रा.नामदेव शिनगारे** १७१

'नंतर आलेले लोक' अरूण काळेःआंबेडकरवादी चळवळीचा कवी
**डॉ. शशिकांत पाटील** १७५

१९९० नंतरच्या मराठी कथेचे बदलते स्वरूप
**प्रा. प्रमोद शंकर पवार** १८१

'गांव आणि शहराच्या मधोमध' मधील परिवर्तनशील जीवन जाणीव
**डॉ.ललित अधाने** १८७

नव्वदोत्तर ग्रामीण कथेतील स्थित्यंतरे
**डॉ. कैलास इंगळे** १९१

'नव्वदोतरी मराठी कथेतील स्त्री चित्रण'
**भंडारी ए.व्ही.** १९५

आंबेडकरी चळवळीचे यशस्वी सूत्र म्हणजे 'जग बदल घालूनी घाव'
**प्रा. मोहन सौंदर्य** १९९

# संघर्षसिध्द झालेल्या समाजाचा उद्‌गार म्हणजे दलित साहित्य

**प्रा.नामदेव शिनगारे**

**प्रस्तावना**

साठोत्तरी कालखंडात दलित साहित्याचा उगम झाला असला तरी त्याची बिजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, तत्वज्ञान आणि चळवळीतून प्रेरणा घेऊन मराठी भाषेमध्ये दलित साहित्याची निर्मिती झालेली आहे. डॉ.आंबेडकरांनी पारंपरिक भारतीय विचार आणि धर्मसंस्थेच्या विरोधात विद्रोह केला आहे. विद्रोही विचारांनी प्रेरित होऊन दलित साहित्याची निर्मिती झालेली आहे. भारतीय दलित समाज सामाजिक अन्याय, वर्णव्यवस्था आणि जातिव्यवस्थेच्या विरोधात एक शब्दही काढू शकत नव्हता. तोच दलित समाज काव्य, कथा, आत्मकथा, नाटक आणि वैचारिक लेखनाच्या माध्यमातून वेदना व्यक्त करुन या व्यवस्थेच्या विरोधात विद्रोह प्रकट करु लागला. या विद्रोही संवेदनांनी आज देशव्यापी रुप धारण केले आहे. अनेक भाषांमध्ये दलित साहित्याची निर्मिती मोठया प्रमाणात होत आहे. मराठी दलित साहित्याप्रमाणे डॉ.आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित होऊन अमराठी भाषिकांनी दलित साहित्याची निर्मिती केली आहे. त्यामध्ये भगवान दास, जयप्रकाश कर्दम, ओमप्रकाश वाल्मिकी, शामसिंह, श्यौराज सिंह, कॅवल भारती, डॉ.कुसुम वियोगी, लक्ष्मीनारायण सुधाकर, एन.आर.सागर, पुरुषोत्तम सत्यप्रेमी, मलखान सिंह, दयानंद बहोटी, सी.बी.भारती, सोहमपाल सुमनाक्षर, प्रेम कपाडिया, कौशल्या बसंती, टी.पी.सिंह अशी कितीतरी नावे आपल्याला दलित साहित्याला व्यापक व समृध्द करणारी साहित्यिकांची यादी देता येईल एवढेच नव्हे तर विश्वस्तरावरही दलित साहित्याला मान्यता मिळाली आहे. जागतिक भाषांमध्ये दलित साहित्याचे मोठया प्रमाणात अनुवाद झालेले आहे.

**सामाजिक समस्या**

एकूणच मराठी साहित्याचा विचार करता असे लक्षात येते की, दलित साहित्य सामाजिक वास्तवतेवर केंद्रित आहे. दलित साहित्यामध्ये कल्पनेला थारा दिला गेला नाही. त्याचे कारण असे की, जिथे भूक आणि अन्नपाण्यासाठी करावा लागणारा संघर्ष व त्यातच अस्पृश्यतेचा लावलेला वर्णव्यवस्थेने कलंक ही सामाजिक समस्या दलित साहित्यिकाला हैराण करणारी असल्याने त्यांच्या अंगी विद्रोही भावनाच प्रकर्षाने जाणवेते. अशा अवस्थेमध्ये दलित साहित्यिक कल्पनाविलासात कसा रमू शकतो ?

दलित साहित्याच्या प्रारंभीच्या काळात जो वाङ्मयप्रकार आला तो कवितेच्या रुपाने दलितांची अस्मिता त्यांनी व्यवस्थेविरुध्द पुकारलेला संघर्षाचा आवाज प्रथमतः मोठया प्रमाणात शब्दबध्द झाला, तो कवितेच्या रुपानेच. कवितेच्या माध्यमातून सजग, संवेदनशील दलित मन प्रकट होऊ लागले. 'अस्मितादर्श' सारख्या त्रैमासिकाच्या उदयानंतर तर दलितांच्या मनातील लाव्हा आणखी मोठया प्रमाणात बाहेर पडू लागला. कवितेबरोबरच कथा, नाटय आणि क्वचित प्रमाणात कादंबरीच्या स्वरुपातही दलित साहित्य लिहिल्या जाऊ लागले. १

दलित साहित्याला लेखनाची मोठी परंपरा नव्हती. त्याचे कारण असे की, ज्या समाजाला लिहिण्यावाचण्याचा मज्जाव होता ते कसे या क्षेत्राकडे वळतील. शिक्षणाचे अधिकार नसलेला हा वर्ग "ठेविले अनंते तैसेची रहावे" ही भूमिका घेऊन पोटाची खळगी भरण्यातच तो अपूरा पडत होता. पूर्वजन्माची फेड म्हणून या जातीत आपण जन्माला आलो अशी भाबडी समजूत घेऊन तो जगत होता. अन्याय अत्याचार सहन करत करत जगण्याशिवाय त्यांच्यासमोर पर्याय नव्हता.

पुढे इंग्रजामुळे आणि एतद्देशिय समाज सुधारकांच्या प्रयत्नातून शिक्षण घेण्याचा अधिकार मिळाला, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकीमुळे त्यांना आत्मभान आले. जगलेलं, भोगलेलं एवढे भयान होते की, त्याला कल्पना विलासाची गरजच नव्हती. जे लिहावेसे वाटते, ते लिहिले पाहिजे. परंतु ते कसे लिहावे ? हा प्रश्न होता. हळू हळू साऱ्याच वाटा मोकळया झाल्या आणि साचलेले, तुंबलेले पाणी बांध फोडून बाहेर पडावे अशी स्थिती दलित लेखकांची झाली आणि मनात आठवलेले, साठवलेले सर्व साहित्याच्या माध्यमातून बाहेर आले. कृत्रिम, बेगडीपणा मोडून पडला. त्यातील आशय व अभिव्यक्ती, भाषा अगदी सरळ साधी म्हणजेच ती सामान्यांची भाषा होती. ती तत्कालीन प्रस्थापित साहित्याच्या चौकटीत बसणारी नव्हती. तरीही नवशिक्षितांनी आपल्या अनुभव कथनापासून सुरुवात केली आणि आत्मकथनांचा जन्म झाला.

आत्मचरित्र आणि आत्मकथन यामध्ये सीमा रेषा स्पष्टपणे जाणवते. आत्मचरित्रातून संपूर्ण जीवनाचा पट मांडला जातो. परंतु दलित आत्मकथनामध्ये सारेच लेखक वृध्द नाहीत पुढेही त्यांना खूप आयुष्य व्यतीत करायचे राहिलेले असते काही लेखकांनी तर वयाच्या तीस पस्तीसाव्या वर्षीच आत्मकथने लिहिली आहेत.

आत्मकथनांच्या कलात्मक मूल्यांमुळे वाचनीयतेचे एक रोचक परिणाम लाभले आहे. त्यामुळे बऱ्याचदा 'आत्मचरित्रात्मक' कादंबरी म्हणूनही आत्मकथनांचा उल्लेख वा समीक्षा केलेली आहे. आत्मकथनांना कादंबरीचा बाज असला तरी आत्मचरित्रात्मक कादंबरीत सत्याला कल्पनेची जोड असते, तर आत्मकथनात सत्याला वास्तवतेची जोड असते. त्यामुळे आत्मचरित्रात्मक कादंबरीहून आत्मकथनाचे स्वरूप वेगळे आहे. हया आत्मकथनांना वाङ्मयीन आणि सामाजिक अशी दोन्ही मूल्ये आहेत. २

येथील समाजव्यवस्थेत शिक्षणामुळे बोलण्याचे धाडस व डॉ.बाबासाहेबांनी दिलेला आत्मसन्मान त्यातून आलेलं भान आत्मकथनातून जाणवते. दया पवार बलुतं मध्ये सांगतात. साने गुरुजींच्या 'भारतीय संस्कृती' या पुस्तकावर निबंध स्पर्धा ठेवलेली. सर्व मुलांना शाळेतून पुस्तक वाचायला दिलेलं पुस्तक वाचून आपलं डोकं भणाणलं होतं. निबंधात भारतीय संस्कृतीची मी खूपच टवाळी केलेली आठवते. आम्हाला कुलकर्णी नावाचे शिक्षक होते. निबंध वाचून ते खूपच अस्वस्थ झाले होते. त्यांनी जवळ बोलावून माझी समजूत काढली, "तू जे विचार मांडतोस ते खरे म्हणजे राष्ट्रदोह आहे." मी त्यांच्याबरोबर तावातावाने भांडलेला आठवतो. खरं म्हणजे मी शाळेत हे जे बोलत होतो, ती काही माझी मतं नव्हती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे 'शूद्र मुळचे कोण होते ?' हे पुस्तक वाचायला मिळाले. शिवाय मुंबईहुन बाबासाहेब संपादित 'जनता' सप्ताहिक बोर्डिंगवर यायचे. त्याच्यातील अग्रलेख मानसिक बळ द्यायचे. वाटायचं, हे खरे आपले विचार भोवतालच्या सामाजिक शोषणाची जाणीव प्रखर होत होती. ३

दलित साहित्याच्या मुळांमध्ये बाबासाहेबांच्या विचारांचा प्रचंड पगडा होता. शिक्षणाशिवाय तरुणोपाय नाही ही जाणीव झाली होती. आठवणीचे पक्षीमधील प्र.ई.सांगतात की, बोर्डिंगमध्ये असताना 'दिल्या भाकरीचा धनी'होता. कारण तो कधी तक्रार करीत नसे.

शाळेतून गणिताच्या तासात इतर पोरांसारखे पळून जाण्यापेक्षा लेखक फाटक्या तुटक्या वहीत गणित सोडवून पहिल्याच दिवशी दाखवत असे, पण गुरुजींनी कधी आपुलकीने, कौतुकाने पाहून सही केली नाही. उलट 'आता ठेवून दे. उद्याला बघू' म्हणायचे. लेखकाच्या बाबतीत 'आजचा उद्या झाला पण उद्याचा आज' काही झाला नाही, हे त्यांचे दु:ख सर्व दलित मुलांचे दु:ख होते. ४

दलितांच्या जीवनाचे डॉ.आंबेडकरांच्या चळवळीने सम्यक परिवर्तनासाठी मानसिक संवर्धन केले. त्यातून त्यांच्या जीवनात परिवर्तन आले. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक जीवनात कमालीचा बदल झाला. भूतकाळातील भोगलेलं जीवन आणि वर्तमानात बदलणारे जीवन याचा आलेख दलित आत्मकथनांनी चितारला आहे. याचा आणखी एक विशेष असा आहे की, महार, मातंग, चांभार, ढोर, कैकाडी, कुडमुडे जोशी, उचल्या, बंजारा, बेरड, गोपाळ, लोहार, न्हावी, कोल्हाटी अशा नानाविध दलित जाती जमातीमधून आत्मकथनं लिहिली गेली. या प्रत्येक जाती-जमातीच्या दु:खाची जातकुळी निराळी आहे. कारण त्यांच जीवनच वेगळ आहे. हे सारं अस्वस्थ करुन सोडणार, थक्क करुन सोडणारं जीवन या आत्मकथनामधून आलं आहे. विविध जाती-जमातीमधील लोकजीवन, जगण्यासाठी चाललेली त्यांची धडपड, त्यांच्या जीवनावर असलेला अंधश्रध्दा, रुढी, परंपरा यांचा पगडा, समाजातील लोकांमधील दारुचे व्यसन, बाहेरख्यालीपणा सारख्या वाईट सवयी, कुटुंबाचे दैन्य, दारिद्रय, ग्रामीण भागातील आणि नागरी भागातील वेगवेगळे कडवट अनुभव आणि आठवणी

चित्रित करताना समूहाचे चित्रण या आत्मकथनांमधून अपरिहार्यपणे येते. ५

थोडक्यात सांगायचे म्हणजे, आत्मोध्दार हेच दलित साहित्याचे प्रयोजन आहे. शेकडो-हजारो वर्ष पिढयानुपिढया सोसत आलेल्या, दैन्य, दु:ख, अन्याय, अत्याचार, यापासून स्वत:ला, समाजाला मुक्त करण्यासाठी संघर्षसिध्द झालेल्या समाजाचा उद्गार म्हणजे दलित साहित्य. त्यामध्ये दलिताची आत्मकथने ही याला अपवाद नाहीत.

**समारोप**

साठोत्तरी कालखंडातील महत्वाचा प्रवाह म्हणून दलित साहित्याकडे पाहिले जाते. या साहित्याने अनेक साहित्य प्रकार हाताळले असले तरी प्रामुख्याने दलित आत्मकथनाच्या माध्यमातून ते अधिक प्रकाश झोतात आले. जे भोगले, अनुभवले ते इतरांना सांगावे, या उद्देशाने सुरुवातीच्या काळात म्हणजे अस्मीतादर्शन मधून अनुभवाच्या माध्यमातून बाहेर येऊ लागले. तत्कालीन कालखंडातील लिखानाच्या एकदम वेगळे प्रकारचे लिखान सुरु झाले आणि प्रस्थापित साहित्याला हादरे देण्याचे काम या साहित्याने केले व आज दलित साहित्य दमदारपणे आपले स्वतंत्र अस्तीत्व निमार्ण करुन समर्थपणे आपापल्या समाजाचे चित्र मांडण्यात यशस्वी ठरले आहे.

**गृहितके :-**

* दलित साहित्याची एक स्वतंत्र शैली आहे.
* वास्तवता हा दलित साहित्याचा गाभा आहे.
* आत्मकथनात सामान्यांची भाषा आहे.
* तत्कालीन साहित्याच्या चौकटीत बसणारी भाषा नाही.

**उद्दिष्ट्ये :-**

* दलित साहित्याच्या प्रेरणांचा शोध घेणे.
* साठोत्तरी साहित्याचा शोध घेणे.
* दलित आत्मकथनाचे वेगळेपण तपासणे.
* आत्मचरित्र आणि आत्मकथनाची सीमारेषा तपासणे.

**संदर्भग्रंथ :-**


१) दलितांची आत्मकथने : संकल्पना व स्वरुप - डॉ.वासुदेव मुलाटे (स्वरुप प्रकाशन औरंगाबाद)

२) दलित आत्मकथन स्वरुप : संकल्पना व सौंदर्य- प्राचार्य शिवदास शिरसाठ (चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद)

३) 'बलुतं'- दया पवार (ग्रंथाली प्रकाशन, मुंबई)

४) आठवणींचे पक्षी : एक चिकित्सक अभ्यास - प्रा.डॉ.कमलाकर कांबळे (कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद)


---


**प्रा.नामदेव शिनगारे**

मराठी विभाग, महिला महाविद्यालय, गेवराई जि.बीड (महाराष्ट्र)



Principal
J.B.S.P.M's Mahila College,
Tq. Georai, Dist. Beed.